बुलडाणा ◆ वर्ष - १ ◆ अंक - 89 ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/25/A1435 ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - 9561596693 ◆ मानद संपादक : गणेश निकम केळवदकर - 9403478540

दैनिक सोमवार दि. २ मार्च २०२६

आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

# बातमी जगत

होळी हार्दिक शुभेच्छा

## # SHORT NEWS

### हटकल्याने शेतकऱ्यावर दगडफेक

**यवतमाळ शहर :** शेतात मोटार चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या इसमांनी विचारपूस केली असता शेतकऱ्यावर दगडफेक केल्याची घटना डोर्ली शेतशिवारात घडली. २६ फेब्रुवारी रोजी रात्री ९.३० वाजता फिर्यादी प्रितम भास्कर नागरगोजे (३२) यांनी शेतात आलेल्या दोन संशयितांची चौकशी केली. यावेळी आरोपी क्रमांक २ तिथून पळून गेला, तर आरोपी प्रकाश वसंतराव इंदुरकर (२०, रा. खानगाव) याने प्रितम यांना दगड मारून कपाळावर व नाकावर जखमी केले. शेजारील शेतकरी मदतीला धावून आले असता आरोपीने आपण 'पाणी पिण्यासाठी आलो होतो' अशी बतावणी केली. यवतमाळ शहर पोलिसांनी याप्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### ५० हजारांची सुझुकी चोरीला

**लोहारा :** यवतमाळ येथील दारव्हा रोडवरील टीव्हीएस शोरूम परिसरातून अज्ञात चोरट्याने एक महागडी दुचाकी लंपास केली. ही चोरी १७ ते २२ फेब्रुवारी २०२६ च्या दरम्यान घडली असून २७ फेब्रुवारी रोजी याची पोलिसांत नोंद करण्यात आली. फिर्यादी बंटी देवराव थोरात (४०, रा. नेताजी नगर, यवतमाळ) यांची सुझुकी ॲक्सेस १२५ मोटारसायकल (क्रमांक एमएच २९ सीडी ९०८९) अज्ञात आरोपीने शिताफीने चोरून नेली. चोरीला गेलेल्या या दुचाकीची किंमत ५० हजार रुपये आहे. लोहारा पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून परिसरात बसवलेल्या सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेत तपास सुरू आहे.

### वणीत वाहन दुरुस्तीच्या वादातून टामीने हल्ला

**वणी :** टायर पंचरच्या दुकानात वाहन दुरुस्ती करण्याच्या कारणावरून झालेल्या वादात चौघांनी मिळून दोघांना टामीने मारहाण केल्याची घटना २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता घडली. फिर्यादी मोहम्मद जैनुद्दीन (४२, रा. मेघदूत कॉलनी) यांना आरोपी मोहम्मद रमजाणी, मोहम्मद सलमान, मोहम्मद शकील आणि मोहम्मद राजा यांनी टामीने तोंडावर व पोटावर मारून त्यांचे दात पाडले. मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या राजेंद्र प्रसाद यांनाही आरोपींनी डोक्यावर टामीने मारून गंभीर जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली. वणी पोलिसांनी याप्रकरणी चौघांविरुद्ध संगनमताने हल्ला केल्याचा गुन्हा नोंदवला असून अधिक तपास करत आहेत.

## ✦ इस्त्रायलने 30 तासांत 2000 हून अधिक बॉम्ब टाकले; नेतन्याहू म्हणाले- आणखी हल्ले करणार

# इस्त्रायल-अमेरिका आणि इराण युद्धाचा तिसरा दिवस

बातमी जगत | प्रतिनिधी

**तेल अवीव/तेहरान :** इस्त्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धाचा आज तिसरा दिवस आहे. शनिवारी सुरू झालेल्या या लढाईच्या पहिल्याच दिवशी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. रविवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, या हल्ल्यांमध्ये 48 इराणी 'नेते' मारले गेले आहेत.







इस्त्रायली सैन्यानुसार, युद्धाच्या पहिल्या 30 तासांत 2,000 हून अधिक बॉम्ब टाकण्यात आले आहेत. यादरम्यान फायटर जेट्सनी 700 हून अधिक उड्डाणे केली आहेत. इराणने प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलसह 9 देशांमधील अमेरिकन तळांवर हल्ले केले. इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी सांगितले आहे की, येत्या काही दिवसांत तेहरानवरील हल्ले आणखी तीव्र होतील. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराणमध्ये 40 दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा आणि सात दिवसांची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. इराणमध्ये सत्ता सांभाळण्यासाठी सध्या तीन लोकांची एक तात्पुरती समिती स्थापन करण्यात आली आहे. यात देशाचे राष्ट्राध्यक्ष मसूद पजश्कियान, न्यायपालिकेचे प्रमुख मोहसेनी एजेही आणि धर्मगुरू अली रजा अराफी यांचा समावेश आहे. इराणमध्ये 200 ठार, 740 जखमी इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानसह 10 मोठ्या शहरांना लक्ष्य केले आहे. यामध्ये 200 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर 740 हून अधिक लोक जखमी झाले आहेत. एका शाळेवर क्षेपणास्त्र पडल्याने 148 विद्यार्थिनींचा मृत्यू झाला असून 45 जखमी आहेत. इराणने प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलसह मध्य-पूर्वेतील 9 देशांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले केले. त्याने कतार, कुवेत, जॉर्डन, बहरीन, सौदी अरेबिया आणि UAE मधील अमेरिकन तळांनाही लक्ष्य केले. UAE मधील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या दुबई शहरातील पाम हॉटेल अँड रिसॉर्ट आणि बुर्ज खलिफाजवळ ड्रोन हल्ला केला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला आहे की इराणचे नवे नेते चर्चा करू इच्छितात आणि त्यांनीही चर्चेसाठी सहमती दिली आहे. द अटलांटिक मॅगझिनला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प म्हणाले की ते लवकरच त्यांच्याशी बोलतील.

# रंगपंचमीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठ सजली

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ सैय्यद इमरान

**मालेगांव :** शहरात रंगपंचमीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत विविध रंगाच्या स्टॉलने सजली आहे. विविध ठिकाणी आकर्षक स्टॉल उभारण्यात आले आहेत. शहरातील प्रमुख चौक व रस्त्यांच्या कडेला रंग, गुलाल, पिचकारी, मुखवटे आणि विविध खेळण्यांनी सजलेले स्टॉल नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. रंगीबेरंगी वस्तूंनी सजलेली दुकाने पाहून लहान मुलांमध्ये विशेष उत्साह दिसून येत आहे.



रंगपंचमीचा सण जवळ आल्यामुळे नागरिक खरेदीसाठी मोठ्या संख्येने बाजारपेठेत दाखल होत आहेत. विविध आकारांच्या आधुनिक पिचकाऱ्या, आकर्षक मुखवटे, सुरक्षित रंगांची मोठ्या प्रमाणात विक्री सुरू आहे. पालक आपल्या मुलांसाठी खास वस्तू खरेदी करताना दिसत असून सर्वत्र उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. सणाच्या निमित्ताने व्यापाऱ्यांनीही विविध प्रकारच्या नवीन वस्तू उपलब्ध करून दिल्या आहेत. बाजारपेठेत वाढलेली गर्दी आणि ग्राहकांचा उत्साह पाहता व्यापाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. रंगपंचमी हा सण आनंद सामाजिक प्रतीक मानला जातो. त्यामुळे मालेगांव शहरातही या सणाचे स्वागत मोठ्या उत्साहात होत आहे. बाजारपेठ रंगोत्सवाच्या तयारीने उजळून निघाली आहे. मालेगांव शहरातील बाजारपेठेत रंगपंचमीनिमित्त विविध रंग, गुलाल आणि आधुनिक पिचकाऱ्यांची आकर्षक रेलचेल पाहायला मिळत आहे. शहरातील प्रमुख ठिकाणी उभारलेल्या स्टॉलवर लहान मुलांसाठी कार्टून पिचकाऱ्या, रंगीत मुखवटे, खेळण्यांची मोठ्या प्रमाणात विक्री सुरू आहे. नागरिक मोठ्या उत्साहाने खरेदी करत आहे रंगपंचमीचा सण जवळ येत असल्याने मालेगांव शहरातील बाजारपेठेत नागरिकांची गर्दी वाढू लागली आहे. विविध आकर्षक स्टॉलवर रंग, पिचकारी आणि सजावटीच्या वस्तू उपलब्ध असल्याने नागरिक खरेदीसाठी मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. लहान मुलांमध्ये विशेष उत्साह दिसून येत असून पालकही खरेदीत सहभागी होत आहेत. सणाच्या पाश्वभूमीवर शहरात उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरण निर्माण झाले आहे. पालकांनी बाजारात विविध पिचकारी व इतर वस्तू खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी सर्वत्र उत्साह होता.

# वाशिम जिल्ह्याच्या आरोग्य सेवेला नवसंजीवनी; ६ प्राथमिक व ३९ उपकेंद्रांना मान्यता

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ सैय्यद इमरान

**मालेगांव :** निती आयोगाच्या मागास जिल्ह्यांच्या यादीत समाविष्ट असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या आरोग्य सुविधांना नवसंजीवनी मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. जिल्ह्यात सहा नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच ३९ उपकेंद्रे कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावाला तत्वतः मान्यता मिळाल्याची माहिती समोर आली आहे.

आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी जिल्ह्यातील अपुऱ्या आरोग्य सुविधांच्या पार्श्वभूमीवर ही मागणी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे लावून धरली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रस्तावित प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये मुंगळा (ता. मालेगाव), वाकद (ता. रिसोड), गिरोली व इंझोरी (ता. मानोरा), मानोली (ता. मंगरुळपीर) तसेच वारा जहांगीर (ता. वाशिम) या ठिकाणांचा समावेश आहे. तसेच कारंजा, मंगरुळपीर, मानोरा, मालेगाव, रिसोड आणि वाशिम तालुक्यातील एकूण ३९ गावांमध्ये उपकेंद्रे सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. या नवीन आरोग्य केंद्रांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना जवळच्या ठिकाणी उपचार सुविधा उपलब्ध होणार आहेत. यासोबतच बीएएमएस, एमबीबीएस, नर्सिंग, फार्मासिस्ट, डीएमएलटी आणि एमपीडब्ल्यू शिक्षण घेतलेल्या स्थानिक तरुण-तरुणींना शासकीय सेवेत रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.एकूणच, या निर्णयामुळे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेला 'बुस्टर डोस' मिळणार असून ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# भावाचे अपत्य नसल्याच्या संशयातून अवघ्या 13 महिन्यांच्या पुतणीची काकाकडून खांडोळी

बातमी जगत | प्रतिनिधी

**धाराशिव :** भावजयीमुळे कुटुंबाची बदनामी झाल्याच्या रागातून माथेफिरू दिराने सख्ख्या भावाच्या १३ महिन्यांच्या मुलीला (पुतणी) शेतात नेऊन तिचा गळा आवळून खून केला. नंतर कोयत्याने तिच्या शरीराचे ७ तुकडे करून ते पोत्यात भरून शेताजवळील नाल्यात पुरल्याची धक्कादायक घटना २८ फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा उघडकीस आली. या क्रौर्याने तुळजापूर तालुक्यातील गवळेवाडी (जि. धाराशिव) गाव हादरून गेले. शंकरेश्वर माने असे या क्रूरकर्माचे नाव आहे.

गवळेवाडी येथील २२ वर्षीय विवाहिता २२ फेब्रुवारीला प्रियकरासोबत पळून गेली होती. या प्रकरणी महिलेच्या पतीने तामलवाडी पोलिस ठाण्यात मिसिंगची तक्रार दिली होती. त्यानुसार पोलिस महिला व तिच्या प्रियकराचा शोध घेत होते. याच दरम्यान २७ फेब्रुवारीला पहाटेच्या सुमारास या महिलेची १३ महिन्यांची मुलगी घरातून गायब झाली. याबाबत मुलीच्या वडिलांनी पोलिसांना कळवले. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी पळून गेलेल्या विवाहिता व तिच्या प्रियकराचा शोध घेतला. ती तुळजापूर तालुक्यातील बावी येथे २७ रोजीच सापडली. पोलिसांनी चौकशी केली असता तिने मुलगी आपल्याकडे नसल्याचे पोलिसांना सांगितले. त्यानंतर पोलिसांनी अज्ञाताविरूद्ध चिमुकलीस पळवून नेल्याचा गुन्हा दाखल केला. पोलिसांना मुलीचा काका शंकरेश्वर याच्यावर संशय आला. त्यास ताब्यात घेऊन खाक्या दाखवताच त्याने १३ महिन्यांच्या पुतणीचा खून केल्याची कबुली दिली. भावाची पत्नी प्रियकरासोबत पळून गेल्याने कुटुंबाची बदनामी झाल्याचा राग अनावर झाल्याने १३ महिन्यांच्या पुतणीला २७ फेब्रुवारी रोजी पहाटे उचलून शेतात नेले. तिचा गळा आवळून खून केला. त्यानंतर कोयत्याने ७ तुकडे केले. हे तुकडे पोत्यात घालून एका छोट्या नाल्यात पुरून ठेवल्याची कबुली त्याने दिली. तामलवाडी पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. तहसीलदार अरविंद बोळंगे यांच्या उपस्थितीत घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.

# निष्पाप कामगारांचा बळी सुरक्षा मानके पाळली नसल्यानेच स्फोट

बातमी जगत | प्रतिनिधी

**नागपूर :** सुरक्षेबाबत मुख्यमंत्र्यांसह केंद्रास पत्रव्यवहार, मात्र दुर्लक्ष

कमी पगार आणि सुरक्षेचा अभाव अशा दुहेरी संकटात काम करणाऱ्या ग्रामीण महिलांच्या आयुष्याचा खेळ मांडणाऱ्या स्फोटक कंपनीत भीषण दुर्घटना घडली. राऊळगाव, डोर्ली आणि वलनी परिसरातील महिला जेथे अवघ्या १३ ते २० हजार रुपयांसाठी मृत्यूच्या छायेत काम करतात तिथे झालेल्या स्फोटाने संपूर्ण परिसर हादरला आहे. "पाणी पिण्यासाठी बाहेर आले म्हणून जीव वाचला," अशा शब्दांत रोशनी मसरामने आपली आपबीती सांगितली, मात्र त्यांच्यासोबतच्या अनेक मैत्रिणींना या मृत्यूने कवटाळले.



संरक्षणतज्ज्ञांच्या मते, जिलेटीन आणि डिटोनेटर्स हाताळताना आवश्यक असलेली 'वाळूची पोती' आणि इतर सुरक्षा मानके पाळली नसल्यानेच हा स्फोट झाला असावा. धक्कादायक बाब म्हणजे माजी मंत्री अनिल देशमुख यांनी वारंवार सेफ्टी ऑडिटची मागणी करूनही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला. ही घटना घडली त्या पॅकिंग युनिटमध्ये त्या वेळी कोणतेही सक्रिय उत्पादन कार्य सुरू नव्हते. नेमके कारण अद्याप तपासाधीन आहे. आम्ही संबंधित अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य करत आहोत असे कंपनीने म्हटले आहे. सर्वच स्फोटके कंपनीचे सेफ्टी ऑडिट करण्यासाठी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांसह केंद्रीय मंत्री, पेट्रोलियम आणि स्फोटके सुरक्षा संघटना व संबंधित विभागाकडे पत्र लिहून केली होती. परंतु याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. मंदा कोटरंगे या ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये आया म्हणून काम करतात, तर दिनेश शेंडे हे मदतनीस आहेत. कोटरंगे गेल्या ३० वर्षांपासून येथे काम करतात. आम्ही नेहमी परमाणे कामावर होतो.

# कामरगाव हादरले! 'बानवले कॉम्प्लेक्स' मधील ठाकरे ज्वेलर्सवर डल्ला; ५ लाखांचा ऐवज लंपास

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ उल्लास ठाकरे

**कामरगाव :** वाशिम जिल्ह्यातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र असलेल्या कामरगाव येथे चोरट्यांनी पुन्हा एकदा पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. बस स्टँडपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या टी-पॉईंट चौफुलीवरील 'बानवले कॉम्प्लेक्स' मधील 'ठाकरे ज्वेलर्स' फोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे ५ लाखांचा ऐवज लंपास केला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण असून, पोलिसांच्या ढिसाळ नियोजनाचा पाढा आता चव्हाट्यावर आला आहे.



नेमकी घटना काय?

अमरावती येथील रहिवासी योगेश दिलीपराव ठाकरे यांचे बानवले कॉम्प्लेक्समध्ये सोन्या-चांदीचे दुकान आहे. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री दुकान बंद करून गेल्यानंतर, १ मार्चच्या पहाटे ५:३० वाजता त्यांना दुकान फुटल्याची धक्कादायक माहिती मिळाली. चोरट्यांनी दुकानाचे चॅनल गेट आणि शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. दुकानातील २ किलो ७० ग्रॅम चांदीचे दागिने, देवघराच्या वस्तू व जुनी मोड असा एकूण ४ लाख ९० हजार रुपयांचा माल चोरट्यांनी लंपास केला.

पोलीस प्रशासनाचा 'रामभरोसे' कारभार

या चोरीनंतर स्थानिक व्यापारी आणि नागरिकांनी पोलीस प्रशासनाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला आहे. कामरगाव हे तालुक्याच्या दर्जाचे मोठे गाव असूनही येथील सुरक्षा व्यवस्था शून्य असल्याचे वास्तव समोर आले आहे.

गस्त कागदावरच: गावात रात्रीच्या वेळी होणारी पोलिसांची गस्त (पेट्रोलिंग) गेल्या अनेक दिवसांपासून पूर्णपणे बंद आहे. याचाच फायदा चोरटे घेत आहेत.

कर्मचाऱ्यांची वानवा: पूर्वी कामरगाव पोलीस चौकीत दिवसा 3 आणि रात्री 2 कर्मचारी तैनात असायचे. मात्र, आता एवढ्या मोठ्या गावाची सुरक्षा केवळ एका कर्मचाऱ्याच्या भरवशावर सोडण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी चौकीत फक्त एकच कर्मचारी असतो, ही बाब आश्चर्यकारक आणि संतापजनक आहे.

तपासाचा 'बोजवारा': ठाकरे ज्वेलर्समध्ये याआधीही दोन-तीन वेळा चोरीच्या घटना घडल्या आहेत. मात्र, आजवर एकाही चोरीचा छडा लावण्यात पोलिसांना यश आलेले नाही. "काही दिवस झाले की प्रकरण दाबले जाते," असा गंभीर आरोप स्थानिक नागरिक करत आहेत.

लोकसंख्येच्या तुलनेत सुरक्षा 'शून्य'!

कामरगावची व्याप्ती आणि लोकसंख्या पाहता येथे तगड्या पोलीस बंदोबस्ताची अत्यंत गरज आहे. गाव मोठे असूनही सुविधा आणि सिक्युरिटीच्या नावाखाली येथे काहीही नाही. पोलीस स्टाफ कमी असल्याचा पुरेपूर फायदा गुन्हेगार घेत आहेत.

"आम्ही रात्रंदिवस मेहनत करून व्यवसाय करतो, पण आमचा माल आणि जीव सुरक्षित नाही. तालुका लेव्हलचे गाव असूनही इथे सुरक्षा व्यवस्था नसेल, तर आम्ही व्यापार कसा करायचा?" असा संतप्त सवाल स्थानिक व्यापाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

नागरिकांची मागणी:

जोपर्यंत पोलीस प्रशासन रात्रीची गस्त वाढवत नाही आणि कामरगाव चौकीत पूर्ण क्षमतेने पोलीस स्टाफ तैनात केला जात नाही, तोपर्यंत अशा घटना थांबणार नाहीत. या चोरीचा तात्काळ छडा लावून गुन्हेगारांना जेरबंद करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. तरी पुढील तपास चालू आहे

# अहंकाराचे दहन आणि समतेचा रंग: होळीचा सण, सामाजिक परिवर्तनाचा क्षण!

**फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला साजरा होणारा होळीचा सण हा केवळ रंगांचा उत्सव नाही, तर तो भारतीय संस्कृतीच्या अंत:करणातील आनंद, बंधुभाव आणि परिवर्तनाचा संदेश घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी साजरे होणारे धूलिवंदन म्हणजे रंगांच्या उधळणीतून नात्यांना नवसंजीवनी देण्याचा दिवस असतो. गावोगावी पेटणाऱ्या होळीच्या ज्वाला आणि सकाळी उधळले जाणारे रंग यामागे एक सखोल तात्त्विक अर्थ दडलेला आहे, ते म्हणजे वाईट प्रवृत्तींचे दहन आणि चांगुलपणाचा स्वीकार. होळीचा उगम पौराणिक कथांशी जोडलेला आहे. दैत्यराज हिरण्यकश्यपू आणि त्याची बहीण होलिका यांची कथा आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. भक्त प्रल्हादाच्या निश्चयी श्रद्धेवर मात करण्यासाठी होलिकेने अग्नीत प्रवेश केला; परंतु सत्य, श्रद्धा आणि भक्तीच्या बळावर प्रल्हाद वाचला आणि होलिका भस्मसात झाली. या कथेतून मिळणारा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. अहंकार, अन्याय आणि अत्याचाराचा अंत निश्चित असतो. परंतु प्रश्न असा आहे की, आपण केवळ होळी पेटवतो की खरोखरच आपल्या मनातील 'होलिका' जाळतो? आजच्या समाजात असूया, मत्सर, द्वेष, राजकीय स्वार्थ, धार्मिक ध्रुवीकरण यांसारख्या प्रवृत्ती वाढताना दिसतात. अशा वेळी होळी ही केवळ विधी न राहता आत्मपरीक्षणाची संधी ठरायला हवी.**



धूलिवंदन म्हणजे रंगांचा खेळ. सकाळी अंगावर रंग उधळत आपण एकमेकांना "बुरा न मानो होली है" असे म्हणत हसतखेळत क्षमा मागतो, क्षमा देतो. समाजातील भेद, जात, धर्म, वर्ग, श्रीमंती-गरीबी क्षणभरासाठी का होईना, विरघळतात. रंगांचे वैशिष्ट्य असे की ते प्रत्येकाला सारखेच रंगवतात. पांढरा कुर्ता असो वा महागडी साडी, रंग लागला की सगळे समान! आजच्या काळात ही समता टिकवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. सोशल मीडियाच्या आभासी जगात आपण 'लाईक्स' आणि 'फॉलोअर्स'च्या मोजपट्टीवर नाती मोजतो. प्रत्यक्ष भेटीगाठी कमी होत चालल्या आहेत. धूलिवंदन हा सण आपल्याला सांगतो माणसांमध्ये मिसळा, मनमोकळे हसा, जुने राग विसरा. अलीकडच्या काळात होळीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर लाकूड जाळले जाते. रासायनिक रंगांचा वापर वाढतो. त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते, त्वचेच्या तक्रारी वाढतात. सण साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणे ही देखील सामाजिक जबाबदारी आहे. शेतीप्रधान देशात फाल्गुन हा हंगाम संपण्याचा आणि नवीन पीक येण्याचा काळ आहे. होळी ही निसर्गाच्या चक्राशी जोडलेली परंपरा आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक होळी, नैसर्गिक रंगांचा वापर आणि पाण्याची बचत हे आजचे 'नवे संस्कार' ठरायला हवेत.

महाराष्ट्रात धूलिवंदनानंतर रंगपंचमीही मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. नागपूर सारख्या शहरात तर मित्रपरिवार, कुटुंबीय आणि समाजातील विविध घटक एकत्र येऊन हा सण आनंदाने साजरा करतात. परंतु काही ठिकाणी रंगांच्या नावाखाली जबरदस्ती, मद्यपान, महिलांवर गैरवर्तन यासारखे प्रकारही घडतात. हे चित्र चिंताजनक आहे. सणांचा आत्मा हा आनंद आणि सन्मानात असतो; दडपशाहीत नाही. "रंग लावला म्हणजे अधिकार मिळाला" अशी मानसिकता बदलायला हवी. धूलिवंदन हे 'सन्मानाने रंगवणे' शिकवते, 'जबरदस्तीने रंग चोपडणे' नव्हे. भारतीय समाजजीवनात सणांचे राजकारणाशीही नाते आहे. काही वेळा सणांच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न होतात. होळीचा खरा संदेश मात्र एकात्मतेचा आहे. विविधतेत एकता ही भारताची ताकद आहे. होळी आपल्याला सांगते मतभेद असू द्या, पण मनभेद नकोत.

आज देशासमोर बेरोजगारी, महागाई, शिक्षण-आरोग्याच्या समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न उभे आहेत. होळीच्या ज्वालेसमोर उभे राहून आपण या प्रश्नांवरही विचार करायला हवा. केवळ व्यक्तीगत राग-द्वेष जाळून चालणार नाही; समाजातील अन्याय, विषमता आणि भ्रष्टाचार यांनाही जाळण्याचा निर्धार हवा. इतिहासात होळीच्या उत्सवात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर राहिला आहे. लोकगीते, फुगड्या, सामूहिक नृत्य यांतून स्त्रियांनी आपला आनंद व्यक्त केला. आजच्या काळात स्त्री-पुरुष समानतेचा संदेशही या सणातून द्यायला हवा. महिलांना सुरक्षित आणि सन्मानाने सण साजरा करता यावा, ही समाजाची जबाबदारी आहे. होळीच्या निमित्ताने बाजारपेठा गजबजतात. रंग, पिचकाऱ्या, मिठाई, पारंपरिक पदार्थ या सर्वांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. गावरान पुरणपोळी, करंजी, गूळ-पोहे यांचा सुगंध घराघरांत दरवळतो. सण हा अर्थचक्रालाही गती देतो. मात्र, खर्चाच्या स्पर्धेत अडकून मूळ आनंद हरवू नये, याची जाणीव ठेवायला हवी.

होळी आणि धूलिवंदन हे नात्यांच्या पुनर्बांधणीचे दिवस आहेत. वर्षभरात गैरसमज होतात, कटुता वाढते. पण या सणाच्या निमित्ताने आपण एकमेकांना भेटतो, मिठी मारतो, "रंगपंचमीच्या शुभेच्छा" देतो आणि नवे वर्ष नव्या उत्साहाने सुरू करतो. ज्या समाजात संवाद थांबतो, तिथे तणाव वाढतो. होळीचा रंग म्हणजे संवादाची सुरुवात. धूलिवंदन म्हणजे अहंकाराची धूळ झटकून टाकणे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंतर्मनातील होळी. आपल्या मनात साठलेले राग, भीती, न्यूनगंड, असुरक्षितता या सर्वांना जाळणे आवश्यक आहे. होळीची ज्वाला आपल्याला धैर्य देते; धूलिवंदनाचा रंग आपल्याला आनंद देतो. आजच्या वेगवान, तणावपूर्ण जीवनात आपण आनंद साजरा करायलाही विसरलो आहोत. होळी हा सण सांगतो, जगणे म्हणजे केवळ स्पर्धा नव्हे, तर उत्सवही आहे.



प्रवीण बागडे
नागपूर, 9923620919
बातमी जगत

होळी आणि धूलिवंदन हे केवळ परंपरा नाहीत; ते जीवनदृष्टी आहेत. अन्यायावर न्यायाचा विजय, द्वेषावर प्रेमाचा विजय, निराशेवर आशेचा विजय हा संदेश या सणात दडलेला आहे. यावर्षी होळी पेटवताना आपण केवळ लाकूड जाळू नये; आपल्या मनातील कटुता जाळू या. धूलिवंदन साजरे करताना केवळ रंग उधळू नये; प्रेम, सन्मान आणि समतेचे रंग उधळू या. रंगांच्या या सणात प्रत्येकाच्या आयुष्यात आनंदाची उधळण होवो, समाजात सौहार्द फुलो आणि आपल्या अंत:करणातील होलिका भस्मसात होवो, हीच अपेक्षा. सर्वांना होळी आणि धूलिवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# काळाराम मंदिर सत्याग्रह: केवळ मंदिर प्रवेश नव्हे, तर मानवी हक्कांचा एल्गार!

**आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारणासाठी जे लढे दिले त्यात काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाचे महत्त्वाचे स्थान आहे. फक्त हिंदूंचाच नव्हे तर सत्ताधारी इंग्रजांनाही जाग यावी आणि त्यावेळच्या दलितांना, शोषितांना सर्व मूलभूत हक्क मिळावेत यासाठी त्यांनी हा लढा उभारला होता. हा लढा २ मार्च १९३० ला सुरू झाला आणि पुढील पाच वर्षे चालला. त्यावेळी सत्ताधारी इंग्रजांच्या दडपशाहीविरोधात कॉंग्रेस लढत होती तर हिंदू धर्ममार्तंडशाहीविरोधात आंबेडकरांचा संघर्ष सुरू होता. नाशिकमधील काळाराम मंदिरात हजारो अस्पृश्यांसह प्रवेश करण्याचा निर्धार डॉ. आंबेडकर यांनी केला होता. त्याबद्दल आंबेडकरांचे चरित्रकार धनंजय कीर लिहितात, "महाराष्ट्रातील स्पृश्य हिंदूंचे नाक जे नाशिक तेच दाबण्याचा निर्धार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. डॉ. आंबेडकरांचा लढा माणुसकीस कलंक लावणाऱ्या अमानुष, अन्यायी आणि अघोर अशा स्वदेशी सनातनी ब्राह्मणी सत्तेविरुद्ध होता."**



काळाराम मंदिराचा सत्याग्रह म्हणजे शोषितांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी आंबेडकरांनी स्पृश्य व सवर्णांना केलेले एक आवाहन होते. आज आपण मंदिरात प्रवेश करणार आहोत. मंदिरात प्रवेश केल्यामुळे आपले प्रश्न सुटणार नाहीत. आपले प्रश्न राजकीय आहेत, सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि शैक्षणिक आहेत. काळाराम मंदिरात प्रवेश करणे म्हणजे हिंदू मनाला केलेले आवाहन आहे. उच्चवर्णीय हिंदूंनी आपल्याला आपल्या हक्कापासून अनेक पिढ्यांपासून दूर ठेवले. आता तेच हिंदू आपल्याला आपला मानवी हक्क देतील का हा प्रश्न या काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या माध्यमातून मी विचारत आहे. हिंदू मन हे आपल्याला एक मानव म्हणून स्वीकारण्यास तयार आहे की नाही हा याची पडताळणी या सत्याग्रहाद्वारे होणार आहे.
— डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

२ मार्च रोजी नाशिक शहरात अस्पृश्यांची मोठी मिरवणूक निघाली. ही मिरवणूक अंदाजे एक मैल लांबीची होती व त्यात सुमारे पंधरा हजार कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. मिरवणूक मंदिराजवळ पोहोचली. काळाराम मंदिराला पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण अशा चारही बाजूंनी दरवाजे होते, व मंदिराचे ते सर्व दरवाजे बंद होते म्हणून मिरवणूक गोदावरीच्या घाटाजवळ गेली. तिथे एक मोठी सभा झाली. दुसऱ्या दिवशी ३ मार्च रोजी मंदिरात प्रवेश करण्याचा निर्णय सभेत झाला. सत्याग्रहीच्या पहिल्या तुकडीत १२५ पुरुष आणि २५ स्त्रिया जातील, असे ठरले. सत्याग्रही चार गटांत विभागून दरवाजांवर धरणे धरून बसले होते. पतितपावनदास (उत्तर दरवाजा), कचरू साळवे (पूर्व दरवाजा), पांडुरंग राजभोज (दक्षिण दरवाजा) व शंकरदास नारायणदास (पश्चिम दरवाजा) असे चार नेते मंदिराच्या चारही दिशांवर आपल्या सहकाऱ्यांसह तयार होते. आंबेडकर आणि भाऊराव गायकवाड हे प्रत्यक्ष सत्याग्रहाच्या ठिकाणची व्यवस्था पहात होते. मंदिराचे सर्व दरवाजे बंद होते. दरवाजे उघडल्यास सत्याग्रही मंदिरात प्रवेश करणार आणि रामाने दर्शन घेणार, असे ठरले. मंदिराभोवती हजारोंच्यावर बंदूकधारी सैनिक तैनात करण्यात आले होते. त्या दिवशी स्पृश्यांनाही मंदिर प्रवेशास मज्जाव करण्यात आला होता. पुढे महिनाभर हा सत्याग्रह सुरूच होता. ९ एप्रिल, १९३० रोजी रामनवमीचा दिवस होता. त्याआधी सनातनी हिंदू आणि सत्याग्रहाचे नेत्यांमध्ये तडजोड झाली आणि असे ठरले की स्पृश्य-अस्पृश्यांनी मिळून रामाला रथ ओढावा. कार्यकर्त्यांसह आंबेडकर मंदिराजवळ आले. पण आंबेडकरांच्या अनुयायांनी रथाला हात लावण्यापूर्वीच सनातनी हिंदूंनी सत्याग्रहींना हुलकावणी देऊन तो रथ दुसरीकडे पळवला. त्या रथाचा पाठलाग आंबेडकरांच्या अनुयायांनी केला व चरण पादुकांजवळ थांबलेल्या सत्याग्रहीच्या लक्षात येताच त्यांनी सर्व शक्ती एकवटून रथ अडविला तेव्हा मारामारी व आंबेडकरांच्या अनुयायांवर दगडांचा वर्षाव झाला. तोवर आंबेडकर प्रत्यक्ष घटनेच्या ठिकाणी पोहचले. दगडांचा वर्षाव चालू होता. इतक्यात पोलिसांचा कडा फोडून भास्कर कद्रे नावाचा सत्याग्रही मंदिरात घुसला आणि रक्ताने माखून बेशुद्ध पडला. डॉ. आंबेडकरांवर दगड पडू नये म्हणून त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या डोक्यावर छत्री धरली होती. उपस्थित सर्व सत्याग्रहींना व स्वतः आंबेडकरांनाही लहान-सहान इजा झाल्या होत्या. या घटनेत एक तरुण रक्तबंबाळ झाला होता नंतर त्याचा मृत्यू झाला. आंबेडकरांनी बॉम्बे प्रांताचे गव्हर्नर फ्रेडरिक साइक्स यांना पत्र लिहून हा सर्व वृत्तांत कळवला होता. "सत्याग्रहानंतर नाशिकमधल्या अस्पृश्यांच्या मुलांच्या शाळा बंद झाल्या. रस्ते बंद झाले, तसेच त्यांना दुकानातून वस्तू देखील मिळेनाशा झाल्या. सनातनी हिंदू त्यांच्यावर दमदाटी करू लागले. तुम्ही माजले आहात अशा शब्दांत अस्पृश्यांना बोलणी खावी लागत होती. ही दु:खे भोगूनही आंबेडकरांनी सत्याग्रह सुरूच ठेवला असे धनंजय कीर लिहितात. या दरम्यान आंबेडकर गोलमेज परिषदेसाठी लंडनला गेले. त्यांच्या अनुपस्थितीत भाऊराव गायकवाड यांनी हा सत्याग्रह सुरूच ठेवला. पाच वर्षे हा लढा चाललाही अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळाला नाही. एका सत्याग्रही तरुणाने रामकुंडात उडी घेतली होती. सर्व सत्याग्रह, सभा, आंदोलने अहिंसेच्याच मार्गाने व्हावीत, असा आंबेडकरांचा आग्रह होता. कुठलाही कायदा मोडायचा नाही, असे ते म्हणायचे. मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी आंबेडकरांनी गव्हर्नरकडे पाठपुरावा केला पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. आंबेडकरांनी ३ मार्च, १९३४ रोजी गायकवाडांना पत्र पाठवले आणि आता सत्याग्रह सुरू ठेवून शक्ती वाया घालवण्यापेक्षा ती शक्ती राजकीय हक्क व शिक्षण घेण्याची सोय मिळवण्यासाठी वापरावी, म्हणून आता सत्याग्रह बंद करण्यात यावा, असे कळवले. त्यानंतर हा मंदिराचा सत्याग्रह बंद करण्यात आला, व तो पुन्हा कधीही करण्यात आला नाही. काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात कवी कुसुमाग्रज हेही सहभागी झाले होते. त्यांच्या क्रांतिकारी कवितांची सुरुवात याच लढ्यापासून झाली आहे. मग शेवटी त्यांनी काळाराम मंदिराचे आंदोलन स्थगित केले. पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच सर्व मंदिरे खुली झाली आणि अस्पृश्यांना प्रवेश मिळाला.




कैलास राऊत
मुख संपादक
बातमी जगत

बातमीजगत हे पत्र मालक, प्रकाशक, कैलास हरीभाऊ राऊत यांनी मुद्रक श्रीकृपा प्रिंटर्स, मुद्रण स्थळ जपान जिन जवळ, दगडी पुल, अकोला जि. अकोला 444002 (M. S. ) येथून मुद्रित करून -कार्यालय : बातमीजगत कार्यालय, देऊळगाव माळी ता. मेहकर जि. बुलडाणा (M. S. ) येथून प्रकाशित केले. संपादकः कैलास हरीभाऊ राऊत मो. 9561596693 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार राहतीलच असे नाही. ) सर्व वाद विवाद मेहकर न्यायालयांतर्गत राहील. ) RNI No . MHBIL/25/A1435

This newspaper is printed by the owner, publisher, Kailas Haribhau Raut, printer Shrikripa Printers, printing place near Japan Jin, Dagdi Pul, Akola Dist. Akola 444002 (M. S. ) and published from -Office: News Jagat Office, Deulgaon Mali Tal. Mehkar Dist. Buldana (M. S. ). Editor: Kailas Haribhau Raut Md. 9561596693 The editor does not necessarily agree with the published articles and news. (The editor is not necessarily responsible according to the P. R. B. Act. ) All disputes will be subject to Mehkar Court. ) RNI No. MHBIL/25/A1435

## घटना - घडामोडी






## अजीम नवाज राही यांच्या "वळीवाच्या वेळा" ला लोकनेते राजारामबापू पाटील उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत

**बुलडाणा :** महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या इस्लामपूर शाखेच्या वतीने देण्यात येणाऱ्या यंदाच्या लोकनेते राजारामबापू पाटील उत्कृष्ट वाङ्मय 2025 पुरस्कारांची घोषणा राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा शामराव पाटील,शाखेचे अध्यक्ष दिपक स्वामी आणि प्रा धर्मवीर पाटील यांनी एका पत्रकार परिषदेद्वारे नुकतीच केली आहे, प्रख्यात मराठी कवी,नामवंत निवेदक अजीम नवाज राही यांच्या अथर्व पब्लिकेशन जळगावने प्रसिद्ध केलेल्या „वळीवाच्या वेळा„ या बहुचर्चित कवितासंग्रहास लोकनेते राजारामबापू पाटील उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार2025 जाहीर झाला आहे. लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या प्रेरणादायी स्मृती जपण्यासाठी गत 30 वर्षांपासून 8 मार्च रोजी साहित्य संमेलनाचे भव्यदिव्य केले जाते.ईश्वरपूर येथे संपन्न होणाऱ्या या 30 व्या साहित्यसंमेलनात प्रसिद्ध लेखिका कवयित्री प्रज्ञा पवार यांच्याहस्ते उपरोक्त पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. प्रख्यात मराठी कवी आणि श्रोताप्रिय नामवंत निवेदक अजीम नवाज राही महाराष्ट्र राज्याच्या लेखणी आणि वाणी या दोन क्षेत्रातील महत्वाचं आणि वलयांकित नाव. व्यवहाराचा काळा घोडा,कल्लोळातला एकांत, वर्तमानाचा वतनदार, तळमळीचा तळ आणि अथर्व पब्लिकेशन जळगाव तर्फे नुकताच प्रसिद्ध झालेला „ ळीवाच्या वेळा„ या पाच कवितासंग्रहांचे ते धनी आहेत.

अजीम नवाज राही हे नाव नवनिर्मितेचे प्रयोगाशीलतेचे बलस्थान असून कुठल्याही मळक्या वाटेने न जाता स्वतःची नाममुद्रा त्यांनी वर्तमान मराठी कवितेच्या पानावर ठसठशीतपणे उमटवली आहे.अजीम नवाज राही यांच्या कवितेने परिघावरचे विश्व मराठी साहित्याच्या केंद्रस्थानी आणले. त्यांच्या कवितेतील व्यक्त होणारे दुःख सर्वसामान्यांच्या,शेतकरी, शेतमजुर, कामगारांच्या,शोषितांच्या किंबहुना अस्तित्वहीन माणसाच्या जगण्यातले आहे. प्रतितिष्ठासंपन किततरी श्रेष्ठ पुरस्कारांचा त्यांच्या कवितासंग्रहांवर वर्षाव झाला आहे. लोकनेते राजारामबापू उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार 2025 प्राप्त „वळीवाच्या वेळा „ कवितासंग्रह समकालीन समाजमनाचं लख्ख प्रतिबिंब आहे. विद्यमान आव्हानांशी थेट भिडताना „वळीवाच्या वेळा„ मधली कविता आक्रस्ताळी वा कंठाळी होत नाही. धर्म,जात,पंथाच्या तटबंदीत न अडकता माणसांची निखळ काळजी वाहते. वास्तवाचा,सकसतेचा, प्रयोगशीलतेचा ध्यास असलेली ही कविता भाषिकअंगाने, अनुभवाच्या अंगाने अगदी समृद्ध आहे. समग्र चिंतीत वर्तमान कवेत घेणारी आहे. त्यांच्या कवितेतली गर्दगहिरी वस्तुनिष्ठता, घनगर्द सच्चाई, प्रतिमाशृंखलांचे अनोखे लावण्य, मातीचा सुवास लेवून आलेली भरजरी,चवदार भाषा. स्वतःची घडवलेली खास मृदगंधी शब्दकळा, ही मोठी दौलत घेऊन जगणारे,लिहिणारे अजीम नवाज राही वर्तमान पिढीतील महत्वाचे कवी आहेत. कवितागणिक, कवितासंग्रहागणिक त्यांच्या कवितेचे निराळेपण अधोरेखित झाले आहे. रेखांकित झाले आहे. मुस्लिम संस्कृती आणि या संस्कृतीबाहेरचा सर्वधर्मीय भोवताल, जीवनरितींचे बहुपदर घेऊन उभी राहिलेली त्यांची कविता मूळात मानव्याचे सुक्त गाणारी आहे.

अजीम नवाज राही यांना आजतागायत अमेरिकेतील फाउंडेशन,भारतातील केशव गोरे स्मारक ट्रस्ट मुंबईचा साहित्य प्रांतातील प्रतिष्ठेचा महाराष्ट्र फाउंडेशन साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय लेखनाचा कवी केशवसुत पुरस्कार, विदर्भ साहित्य संघाचा शरदचंद्र मुक्तीबोध, नारायण सुर्वे पुरस्कार ,आपटे वाचन मंदिर इचलकरंजीचा इंदिरा संत पुरस्कार,शरद पवार ग्रंथ पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, लोकमत समूहाचा लोकमत साहित्य पुरस्कार, भि ग रोहमारे पुरस्कार, शिवसेना नवरत्न पुरस्कार, ना घ देशपांडे पुरस्कार, मराठा सेवा संघ जिजाऊ साहित्यरत्न पुरस्कार, शिक्षण महर्षी तात्याराव मोरे पुरस्कार,कविवर्य देवानंद गोरडे पुरस्कार,मराठवाडा साहित्य परिषद,साहित्य परिषद पुणेचा पुरस्कार,प्रज्ञा उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार इत्यादी मातब्बर पुरस्कार मिळाले आहेत. इयत्ता 10 वी ,इयत्ता 11वी व महाराष्ट्राच्या 11 विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात अजीम नवाज राही यांच्या कवितांचा समावेश आहे.

## बाभळी बंधाऱ्यातून 0.6 टीएमसीपाणी तेलंगणा राज्यासाठी सोडले

बातमी जगत | प्रतिनिधी

**नांदेड :** बाभळी बंधाऱ्याचे दरवाजे उघडून उपलब्ध साठ्यातून विसर्ग करण्यात आला. बाभळी बंधाऱ्याचे दरवाजे उघडून उपलब्ध साठ्यातून विसर्ग करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील बाभळी बंधाऱ्याचे दरवाजे उघडून उपलब्ध जलसाठ्यातून रविवारी (१ मार्च) सकाळी ९.३० वाजता गेट क्रमांक २,३ व ४ मधून सुमारे ३० हजारक्युसेक वेगाने ०.६ टीएमसी पाणी तेलंगणाच्या दिशेने सोडण्यात आले. पाणी सोडल्यानंतर बंधाऱ्याचीपातळी ३३०.८० मीटर असून ७.१८दलघमी साठा शिल्लक आहे. बाभळी बंधारा पूर्ण होऊन १३ वर्षेपूर्ण झाली. या वर्षी बंधाऱ्यातक्षमतेइतका म्हणजेच २.७४ टीएमसीसाठा आहे. त्यामुळे गोदावरी नदीपात्रतुडुंब भरले आहे. सर्वोच्चन्यायालयानुसार २९ ऑक्टोबर रोजीदरवाजे बंद करायचे आदेश होते,परंतु शेतकऱ्यांनी विरोध केल्यानेगतवर्षी १८ नोव्हेंबर २०२५ रोजीत्रिसदस्यीय समितीच्या उपस्थितीतदरवाजे बंद केले होते. त्यानंतररविवारी निर्देशानुसार विसर्ग केला.

# बुलढाणा-चिखलीसाठी अधिक चांगल्या आरोग्यसुविधेसह स्वतंत्र कर्करोग रुग्णालयाची ठोस मागणी

### ✦ विधानसभेत आमदार सौ.श्वेता महाले पाटील यांची जिल्ह्यासाठी ठाम भूमिका ..

बातमी जगत | प्रतिनिधी




महाराष्ट्र विधानसभेत पूरक मागण्या 2025-26 वर बोलताना चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदारk सौ.श्वेता महाले पाटील यांनी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले.चिखली व बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणींचा परामर्श घेत त्यांनी या अडचणी सोडवण्याकरिता ठोस निधीची व अन्य तरतुदीची मागणी केली.

निकृष्ट दर्जाच्या ज्वारी वितरणावर आक्षेपसंदर्भात बोलताना आमदार सौ. श्वेता महाले पाटील म्हणाल्या की, खरीप हंगाम 2024-25 अंतर्गत किमान आधारभूत किंमत योजनेतून खरेदी करण्यात आलेली ज्वारी व मका सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरित होत असला तरी बुलढाणा जिल्ह्यातील ज्वारी मोठ्या प्रमाणात जाळे, पावडर, सोंडेयुक्त व निकृष्ट दर्जाची आहे. स्वस्त धान्य दुकानांत लाभार्थ्यांना चाळणी न केलेली ज्वारी मिळत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गोदाम व्यवस्थापकांना चाळणी करून स्वच्छ धान्य देण्याचे आदेश असूनही प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे निकृष्ट ज्वारीचे वितरण तात्काळ थांबवावे,ज्वारी व मका चाळणी करून स्वच्छ स्वरूपातच द्यावेत,सर्व तालुक्यांत धान्य वितरणाचे परिमाण समान ठेवावे, यासाठी आवश्यक निधीची तरतूद करावी,अशी मागणी त्यांनी केली. चिखली मतदारसंघातील शिवभोजन थाळी केंद्र चालकांची प्रलंबित देयके तत्काळ अदा करावीत आणि चिखली व बुलढाणा तालुक्यात 20 नवीन शिवभोजन केंद्रांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून द्यावा, अशीही त्यांनी मागणी केली. चिखली उपजिल्हा रुग्णालय 100 खाटांचे करावे

चिखली प्रतिनिधी

सार्वजनिक आरोग्य विभागावर बोलताना आमदार महाले पाटील यांनी चिखली ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले; मात्र 50 खाटांचे रुग्णालय अपुरे पडणार असल्याचे नमूद केले.

चिखली शहराची लोकसंख्या व तालुक्यातील 150 गावांचा विचार करता रुग्णालयाची क्षमता 100 खाटांची करण्यात यावी, तसेच महिला व बाल रुग्णालय इमारतीचा प्रस्ताव तातडीने सादर करून आवश्यक निधी मंजूर करावा, अशी त्यांनी ठाम भूमिका मांडली.तसेच चिखली उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, नर्सेस व प्रशासकीय रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणीही त्यांनी सभागृहात केली. चिखली विधानसभा मतदारसंघातील मासरूळ ता. जि. बुलढाणा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र नसल्याने नागरिकांना किरकोळ आजारासाठीही दूरवर जावे लागते. त्यामुळे मासरूळ येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे सुविधा वाढवाव्यात यासाठी आ. सौ. श्वेता महाले यांनी बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालय येथे डॉक्टर व नर्सेसची मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्याने रुग्णांना इतरत्र रेफर करावे लागत असल्याचे निदर्शनास आणले.रुग्णालयात खाटांची कमतरता असल्याने अपघात व प्रसूती रुग्णांना तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे. बेड खरेदीसाठी व सिटीस्कॅन, एमआरआय यंत्रणा उपलब्ध करण्यासाठी निधी मंजूर करावा, अशी त्यांनी मागणी केली. महिलांमध्ये वाढत्या स्तन व गर्भाशय कर्करोगाच्या घटनांचा उल्लेख करत बुलढाणा येथे स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याचीही मागणी त्यांनी केली, जेणेकरून रुग्णांना पुणे-मुंबईसारख्या दूरच्या शहरात जावे लागू नये. विधानसभेत बोलताना आमदार श्वेता महाले पाटील यांनी चिखली व बुलढाणा जिल्ह्यातील अन्नधान्य वितरणातील त्रुटी, आरोग्य सुविधा वाढ व शिवभोजन योजनेचा विस्तार यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर ठाम भूमिका मांडत आवश्यक निधी तरतुदीची मागणी केली.त्यांच्या या प्रभावी मांडणीमुळे चिखली मतदारसंघातील नागरिकांच्या प्रश्नांना शासन पातळीवर सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मेहकर तालुक्यात चोरीचे प्रमाण वाढले, पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ विष्णु आखरे पाटील

**मेहकर :** मेहकर तालुक्यात चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. मेहकर तालुक्यातील सुकळी ,नागापूर ,लोणी गवळी सह इतर ठिकाणी सशचोऱ्या होत असून पोलिसांकडून मात्र अद्याप चोरट्यांना पकडले नाही यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मेहकर तालुक्यातील उकळी येथे चोरट्यांनी घरावर डल्ला मारला असून सोन्याच्या दागिन्यांसह तब्बल २ लाख ४२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली आहे. अशोक रामकिशन धांडे (वय ५६) हे शेतकरी आपल्या कुटुंबासह उकळी येथे वास्तव्यास आहेत. त्यांनी १२ एकर शेतीपैकी १० एकरमध्ये सोयाबीन पेरले होते. त्यातील ३५ क्विंटल सोयाबीन विकून त्यांना १ लाख २८ हजार ७०० रुपये रोख मिळाले होते. हे पैसे आणि अंदाजे १ लाख १४ हजार रुपये किमतीचा ४० ग्रॅम वजनाचा सोन्याचा चपलहार त्यांनी घरातील मागील खोलीत कॅटलीत सुरक्षित ठेवला होता.

मात्र २६ फेब्रुवारीच्या रात्री चोरट्यांनी घरातील जिन्यावरील पत्र्याच्या झाकणाची दोरी कापून घरात प्रवेश केला. अशोक धांडे हे शेतात झोपण्यासाठी गेले असताना घरात पत्नी, मुलगा आणि सून झोपलेले होते. सकाळी सहा वाजता पत्नी उठली असता कॅटली खाली पडलेली आणि उघडी दिसली. आत पाहताच रोख रक्कम आणि सोन्याचा हार गायब असल्याचे लक्षात आले. या प्रकरणी अशोक धांडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मेहकर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

लोणी गवळी येथे २४ फेब्रुवारी रोजी अज्ञात चोरट्यांनी घर फोडून सोन्याच्या दागिन्यांसह १ लाख २८ हजार रुपयांचा लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी रघुनाथ तुकाराम दोडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध डोणगाव पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल केला आहे.

नागापूर येथे २२ फेब्रुवारी रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने व रोकड असा एकूण ४४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी संतोष खनपटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध डोणगाव पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला आहे.

## मराठी भाषा महाराष्ट्राची गौरवपूर्ण भाषा : गुणरत्न पखाले

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ सैय्यद इमरान



**मालेगांव :** येथील मिलिंद वाचनालयाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुणरत्न पखाले होते. यावेळी बोलताना पखाले म्हणाले की, मराठी ही प्राचीन व समृद्ध भाषा असून तिला मागील वर्षी अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे, ही सर्व मराठी भाषिकांसाठी अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्राबरोबरच जगभरात वास्तव्य करणाऱ्या मराठी माणसांसाठी हा सन्मान आनंददायी आहे. मराठी भाषा ही खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची गौरवपूर्ण भाषा असून तिच्या जतन आणि संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक मराठी नागरिकाची आहे, असे त्यांनी नमूद केले.

पुढे ते म्हणाले की, मराठी भाषेबरोबरच मराठी साहित्य व संस्कृतीही तितकीच महत्त्वाची आहे. मराठी माणसामध्ये मोठी जबाबदारी पेलण्याची आणि 'दिल्लीचे तख्त' सांभाळण्याची ताकद आहे, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. कार्यक्रमात उपस्थित वाचकांनी मराठी साहित्याचे विविध लेखन वाचन करून मराठी भाषा गौरव दिन साजरा केला. प्रमुख पाहुणे म्हणून शालिक बोरचाटे यांनीही मराठी भाषेच्या जतनासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमास पत्रकार सैय्यद इमरान, प्रवीण गायकवाड, छगन ताजने, ओम लोलगे, अमोल ठाकरे, वैभव जाधव, योगेश शेळके, श्रीरंग जोशी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणिता गवई यांनी केले तर आभार प्रदर्शन गौतम शेजूळ यांनी केले.

## युद्धजन्य परिस्थितीमुळे 'उमरा' यात्रेकरू संकटात

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** रमजानच्या पवित्र महिन्यात 'उमरा' या धार्मिक विधीसाठी सौदी अरेबियात गेलेल्या महाराष्ट्रातील सुमारे ५० हजार ते १ लाख मुस्लिम बांधवांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आखाती देशांमधील बिघडलेली युद्धजन्य परिस्थिती पाहता, हे भाविक तेथे अडकल्याची दाट शक्यता राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने तातडीने हालचाली सुरू केल्या असून, सर्व यात्रेकरूंना सुरक्षित परत आणण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांची सरकारकडे अधिकृत नोंद असते, मात्र उमरासाठी अशी कोणतीही केंद्रीकृत व्यवस्था नाही. बहुतांश यात्रेकरू खासगी टूर अँड ट्रॅव्हल्स ऑपरेटर्समार्फत प्रवास करतात. "राज्यातील सुमारे ५०० हून अधिक ऑपरेटर्सनी यंदा यात्रेकरूंना पाठवले असून, त्यापैकी केवळ मुंबईतूनच १०० हून अधिक ऑपरेटर्स सक्रिय आहेत. त्यामुळे अडकलेल्या भाविकांचा नेमका आकडा सोमवारपर्यंत स्पष्ट होईल," असे प्यारे खान यांनी सांगितले. उमरासाठी गेलेल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांतील भाविकांचा समावेश आहे.

## स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळासाठी कुंभार समाज आक्रमक

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ अनिल चित्ते



**धुळे :** राज्यातील ४० ते ५० लाख लोकसंख्या असलेल्या कुंभार समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी 'श्री संत शिरोमणी गोरा कुंभार आर्थिक विकास महामंडळा'ची घोषणा चालू अधिवेशनातच करावी, अशी आग्रही मागणी कुंभार समाज सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सतिशदादा दरेकर यांनी केली आहे. 'मातीकला बोर्डा'च्या नावाखाली समाजाची दिशाभूल थांबवून स्वतंत्र महामंडळ स्थापन करावे, असा सूर आता उमटू लागला आहे.

यापूर्वी शासनाने 'मातीकला बोर्ड' मंजूर केले होते, मात्र ते खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या अंतर्गत असल्याने त्यात अनेक जाचक अटी घालण्यात आल्या होत्या. तत्कालीन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या बोर्डासाठी १० कोटी रुपये मंजूर केले होते, परंतु तांत्रिक अडचणी आणि पाठपुराव्याअभावी हा निधी खर्च होऊ शकला नाही. या बोर्डाचा अध्यक्ष खादी ग्रामोद्योग विभागाचा असल्याने समाजाच्या मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप दरेकर यांनी केला आहे. खादी ग्रामोद्योग विभागावर अवलंबून न राहता स्वतंत्र महामंडळ हवे, जेणेकरून निर्णयाचे अधिकार समाजाच्या प्रतिनिधींकडे असतील. इतर समाजांसाठी (ब्राम्हण, सुतार, गुरव) स्वतंत्र महामंडळे कार्यान्वित झाली असताना, कुंभार समाजाची मागणी का प्रलंबित आहे? असा सवाल उपस्थित केला जात आहे. पारंपरिक मातीकलेला लघुउद्योगाचा दर्जा देऊन व्यवसायाचे आधुनिकीकरण करण्यासाठी हक्काच्या निधीची गरज आहे. मातीकला बोर्डाच्या संकल्पनेत 'कुंभार' हा शब्दच नसल्याने त्यातून नेमका कोणाचा विकास होणार, हा प्रश्न आहे. सरकारने केवळ घोषणा न करता या अधिवेशनात महामंडळासाठी ठोस आर्थिक तरतूद करावी, अन्यथा समाजात तीव्र असंतोष पसरेल. सतिशदादा दरेकर, संस्थापक अध्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांकडे या संदर्भात सातत्याने पाठपुरावा सुरू असून, आता सरकार काय निर्णय घेते याकडे संपूर्ण समाजाचे लक्ष लागले आहे.

### ✦ किलबिल पाखरांची.......

## जानेफळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय मराठी शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न.......

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत





**मेहकर :** तालुक्यातील जानेफळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळेत शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी भारदस्त, बहारदार किलबिल पाखरांची या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन शाळेच्या वतीने करण्यात आले होते. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतिष मुरडकर, उपाध्यक्षा सौ मिराताई जयराज चव्हाण मुख्याध्यापक विश्वनाथ मगर जानेफळ पोलिस स्टेशनचे ठाणेदार आजिनाथ मोरे, तुळजाई उद्योग समूहाचे प्रमुख डॉ केशव अवचार, अंबिका महिला अर्बनचे अध्यक्ष मोहन पाटील धोटे जानेफळच्या सरपंच सौ रुपालीताई गजानन वडणकर तुळजाई महिला अर्बनच्या अध्यक्षा सौ प्रिती केशव अवचार सामाजिक कार्यकर्ते प्रा कृष्णा हावरे डॉ शिवानंद साखरे ग्रामपंचायत सदस्य मंटू राजुरकर जानेफळ प्रेस क्लबचे अध्यक्ष मनिष मांडवगडे पत्रकार अमर राऊत, गणेश सवडतकर, विशाल फितवे डॉ श्रीकृष्ण काकडे रविंद्र वाघ, ग्रामपंचायत सदस्य भारत घायवट बंडू केदारे प्रदिप कृपाळ रवि सवडतकर राजु अवचार दिपक आडवे देवानंद वानखेडे अमोल नवले यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी बहारदार विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश मगर शिक्षिका संगिता राऊत यांनी तर आभार मुख्याध्यापक विश्वनाथ मगर यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळेतील रामेश्वर राठोड, सुरेश चव्हाण, नंदकिशोर बळी, संगिता राऊत, जगदिश पठाडे, सौ शिला पाटील, ज्योती तेलंग, महेश तेजराव निकस आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात



### पेण शहरात श्री सदस्यांची स्वछता मोहीम १५ टन कचरा केला गोळा

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ किरण बांधणकर

पेण : थोर समाजसुधारक डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंती निमित्त पेण तालुक्यातील श्री सदस्यांनी आज रविवारी पेण शहरात स्वछता मोहीम राबवली. यामध्ये १५ टन कचरा गोळा करण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत पेण तालुक्यातील १५ बैठकांतील श्री सदस्य सामील झाले होते. थोर निरूपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंती निमित्त पेण, दादर, वरवणे, सापोली, हनुमान पाडा, वरसई, धावटे, वाशी, रावे, वडखळ , आंबिवली, भाल, वाशीनाका, जिते, शिर्की, या बैठकांतील श्री सदस्यांनी आज ( ता.१) रविवारी पेण शहरात स्वच्छता अभियान राबविले. यामध्ये पेण शहरातील तहसील कार्यालय , प्रांताधिकारी कार्यालय , पोलीस स्टेशन, पेण फौजदारी व दिवाणी न्यायालय ,पेण बस स्थानक , रामवाडी बसस्थानक, रामवाडी एस. टी. विभागीय कार्यालय, पेण उपजिल्हा रुग्णालय , रेल्वे स्टेशन , वैकुंठ धाम स्मशानभूमी आदि सह पेण प्रायव्हेट हायस्कुल रस्ता,कुंभार आळी , हुडको कॉलनी , नंदीमाळ नाका , शिवाजी चौक ,चावडीनाका , धरमतर रोड , चिंचपाडा रोड, उत्कर्ष नगर , साई मंदिर , अंतोरे रोड , रायगड बाजार परिसर अशा शहरातील अंतर्गत २१ कि. मी चे रस्ते ठिकाणी स्वच्छता करुन ४. ३५५ टन ओला व ११. २०० टन सुका कचरा गोळा केला. झालेला कचरा शहारा बाहेरील डम्पिंग ग्राउंड येथे नेऊन जमा केला.या स्वछता अभियानात ९७० श्री सदस्य सहभागी झाले होते. यावेळी बोलताना कोणती ही प्रसिद्धी न करता, गाजावाजा न करता स्वछता मोहीम राबवली जाते. बराच वेळा जिथे गर्दी तिथे गोंधळ असतो मात्र डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान च्या सदस्यांनी दाखवून दिले कि जिथे भक्ती आणि शक्ती असते तिथे शांतता असते.हजारो श्री सदस्य हातात झाडू घेऊन शहर स्वच्छ करत असतात. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी सुरु केलेले हे कार्य डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी, सचिन दादा धर्माधिकारी यांनी सुरु ठेवले आहे हे कार्य म्हणजे स्वच्छते ची चळवळ आहे, संस्काराची एक चळवळ आहे.बैठकी च्या माध्यमातून प्रतिष्ठान चे हे कार्य जसे अंतरमन स्वच्छ करते तसे शहर, गाव स्वच्छ करुन एक नवा आदर्श देखील निर्माण केला आहे हा आदर्श शहरातील नागरिकांनी घेऊन शहर स्वच्छ ठेवावे असे आवाहन नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांनी यावेळी केले.डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान च्या माध्यमातून स्वछता बरोबरच बैठकी च्या माध्यमातून व्यसनमुक्ती चे खूप मोठे कार्य केले जात आहे. प्रतिष्ठान च्या स्वछता मोहिमेची दखल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील घेतली व प्रतिष्ठान चे कौतुक केले. पर्यावरण रक्षणासाठी फक्त वृक्षारोपण करुन नाही तर लाखो झाडं जगवून त्यांची देखभाल करुन पर्यावरण समतोल राखण्याचे काम, आरोग्य शिबीर घेतले जाते. देशातील सर्वात मोठे रक्तदान शिबीर घेण्याचा रेकॉर्ड देखील या प्रतिष्ठान च्या नावे आहे अशी अनेक सेवाभावी कार्य केले जातात असे पाटील यांनी म्हटले. यावेळी उप नगराध्यक्ष निवृत्ती पाटील, नगरसेवक अजय क्षीरसागर ,मितेश शहा, अभिराज कडू,नगरसेविका कलावती पाटील, जस्विन पाटील, मुख्याधिकारी जीवन पाटील, आरोग्य निरीक्षक दयानंद गावंड आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

### बदलापूरमध्ये धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी तणाव

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** बदलापुरात भाजपच्या एका स्थानिक महिला नेत्याच्या मुलीने प्रभू श्रीरामांबाबत सोशल मीडियावर प्रक्षोभक आणि आक्षेपार्ह विधान केल्यामुळे शनिवारी बदलापूर शहरात प्रचंड तणाव निर्माण झाला. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन भाजपने संबंधित महिला पदाधिकाऱ्याचा राजीनामा घेतला असून, पोलिसांनी आरोपी मुलीला ताब्यात घेऊन तिच्यावर गुन्हा दाखल केला आहे. बदलापूर पूर्व येथील भाजप महिला आघाडीच्या पदाधिकारी प्रतिभा जाधव यांची कन्या मृणाल जाधव हिने इन्स्टाग्रामवर एक 'रील' शेअर केले होते. या व्हिडीओमध्ये तिने प्रभू श्रीरामांबद्दल अत्यंत आक्षेपार्ह आणि शिवराळ भाषेचा वापर केला होता. हा व्हिडीओ व्हायरल होताच बदलापूरमधील हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या. शनिवारी सकाळपासूनच खरवई परिसरातील दुकाने आणि रिक्षा संघटनांनी कडकडीत बंद पाळून आपला निषेध नोंदवला. या घटनेचे पडसाद उमटताच भारतीय जनता पक्षाने तातडीने पावले उचलली. मृणाल जाधवची आई प्रतिभा जाधव यांचा पक्षाने पदाचा राजीनामा घेतला असून त्यांना पक्षातून बडतर्फ केले आहे. प्रभू श्रीरामांविषयी अश्लाघ्य भाषा वापरणे हे केवळ धार्मिक भावना दुखावणारे नाही, तर हिंदूंच्या अस्मितेवर आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीवर आघात करणारे आहे. अशा कृत्याला माफी नाही, अशा शब्दांत भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी आपला संताप व्यक्त केला. या प्रकरणावर मृणालचे वडील महेश जाधव आणि आई प्रतिभा जाधव यांनी स्थानिक माध्यमांशी बोलताना अश्रूंना वाट मोकळी करून दिली. आम्ही हिंदू सण मोठ्या उत्साहात साजरे करतो, घरात नियमित पूजा-अर्चा असते, असे सांगत त्यांनी या प्रकाराबद्दल तीव्र खेद व्यक्त केला. दरम्यान, पोलिसांनी मृणाल जाधवला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. भाजपच्या नेत्या चित्रा वाघ म्हणाल्या की, बदलापूर पूर्व मधील महिला मोर्च्याच्या अध्यक्ष आहे तिच्या मुलीकडून प्रभू श्रीरामांविषयी वापरण्यात आलेली शिवराळ भाषा अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह आहे. अशा प्रकारची वक्तव्ये कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाहीत.प्रभू श्रीरामांविषयी अश्लाघ्य भाषा वापरणे हे केवळ धार्मिक भावना दुखावणारे नाही, तर हिंदूंच्या अस्मितेवर .. महाराष्ट्राच्या संस्कृतीवर आघात करणारे आहे. कोणतीही व्यक्ती, ती कोणत्याही पदावर असो किंवा कोणाचीही नातेवाईक असो अशा कृत्याला माफी नाही.भारतीय जनता पक्ष नेहमीच संस्कार, श्रद्धा आणि संविधान यांचा सन्मान करत आला आहे. त्यामुळे संबंधित मुलीवर तात्काळ कारवाई करण्यात आलेली आहे.

# संभाजीनगर भिमटेकडी येथील जागतीक धम्मपरिदेला त्यागमुर्ती नागोराव जाधव गुरूजी यांच्या स्मरणार्थ बाबासाहेब जाधव कडून दहा हजाराचे धम्म दान

बातमी जगत | प्रतिनिधी



**बुलडाणा :** मातृतीर्थ सिंदखेड राजा येथील त्यागमुर्ती नागोराव जाधव गुरूजी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नागभूमी नागपूर येथे 14 आक्टोंबर 1956 रोजी हिन्दु धर्माचा त्याग करून महाकरूणीक भगवान गौतम बुध्दाचा विज्ञानवादी बौद्ध धर्म स्वीकारून धर्मांतर केले त्यांच्या सोबत भारतातील महार व खालच्या जातीतील 9 कोटी जनतेने बौध्द धर्माची शपथ घेऊन हिन्दु धर्माचा त्याग करून बौध्द धर्म स्वीकारला हे जगातील सर्वात मोठे धर्मांतर होते.

त्या धर्मातरच्या दुसऱ्या दिवसी सिंदखेड राजा येथील त्यागमुर्ती नागोराव जाधव गुरूजी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 15 आक्टोंबर 1956 रोजी दर्शन घेऊन म्हणाले की, बाबा मला तुमच्या सोबत काम करावयाचे आहे. तर बाबासाहेब म्हणाले की, तू काय करतोस तर ते म्हणाले मी शिक्षक आहे. बाबासाहेब म्हणाले तूला नोकरी सोडावी लागेल व त्याच दिवशी नोकरीचा राजीनामा दिला व विनाचपल निःस्वार्थ जे वाहन भेटेल पायी वाड्या वसत्यात जाऊन मीळेल तेथे जेवन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व आपल्यावर लादलेला हिन्दु धर्माचा पगडा हिन्दु धर्मामधील अंधश्रद्धेचा विचार सोडा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व विज्ञानवादी बोध्द धर्माचा स्वीकार करा तरच आपल्या समाजाची प्रगती आहे असा विचार अहोरात्र निळी डोपी डोक्यावर घालून मरेपर्यंत प्रचार प्रसार करणारे त्यागमुर्ती नागोराव जाधव गुरूजी यांच्या स्मरणार्थ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) भिमटेकडी जटवाडा येथील विश्वशांती बुध्द विहार समितीच्या आयोजीका आर्याजी प्राध्यापीका धम्मदर्शना माहाथेरो यांनी तीस वर्षे संघर्ष करून भिमटेकडी वसाड जागेवर बौध्द धम्मची बाग फुलवीली त्या बागेत बुध्दाचा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार पेरण्याचे काम त्या करीत आहेत.

अशा या वसाड वस्तीत धम्मची बगफुलवून त्या बागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या हायातीत रंगून (जपान) येथे पहीली जागतीक धम्मपरिषद झाली होती. आता 26 फेब्रुवारी ते 2 मार्च असा पाच दिवस धम्म परिषद छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील भिमटेकडी जडवाडा येथे दुसरी धम्मपरिषद होत आहे.

या भव्यदिव्या धम्मपरिषदेत 30 देशातील बौध्द भिक्खू-भिक्खुणी संघ धम्मदेशना देत आहे.दररोज हाजारो बौध्द अनुयायी उपासक उपासिका हजेरी लावून धम्मदेशना घेत आहे. अशा बुध्द धम्माचा प्रसार प्राचार व्हा म्हणून आर्याजी प्राध्यापीका धम्मदर्शना महाथेरो यांनी आयोजित केलेल्या जागतीक धम्म परिषदेला त्यागमुर्ती नागोराव जाधव गुरूजी यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले बुलडाण्याचे जिल्हा संपर्क प्रमुख पत्रकार बाबासाहेब जाधव व त्यांच्या सुनबाई मा.शिक्षण विस्तार अधिकारी विमलताई जाधव हे 80 टक्के समाजकारण, धर्मकारण व 20 टक्के राजकारण करणारे यांनी या जागतीक धम्म परिषदेला वडीलांच्या स्मरणार्थ 10 हजाराचे धम्म दान परिषदेच्या धम्मपिठावर प्राध्यापक आर्याजी धम्मदर्शना महाथेरो व भंते संघपाल यांचे पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले व वडीलांच्या स्मरणार्थ 10

हजार रूपयाचे धम्म दान केले यावेळी दैनिक सामपत्रचे संपादक गणेश दादा सुरडकर, भिक्खु-भिक्खूणी संघ उपासक-उपासिका यांच्या उपस्थितीत दिले.

या धम्मदान देण्यामागे माझा प्रचार व्हा म्हणून मी करीत आहे हा समज उपासक उपासिकांनी करून घेऊ नये कारण बुध्द धर्मात दान परिमीतेला अन्यासाधारण महत्व आहे म्हणून धम्माचा प्रचार व प्रसार व्हा म्हणून धम्मदान हे अत्यावश्यक आहे म्हणून धम्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी प्रत्येकानी धम्मदान करावे हा उद्देश समोर ठेवून केला आहे.

## उकळी येथे चोरी २ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास

बातमी जगत | प्रतिनिधी



**मेहकर :** समाधान पद्मणे तालुक्यातील उकळी येथे चोरट्यांनी घरावर डल्ला मारला असून सोन्याच्या दागिन्यांसह तब्बल २ लाख ४२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली आहे. अशोक रामकिशन धांडे (वय ५६) हे शेतकरी आपल्या कुटुंबासह उकळी येथे वास्तव्यास आहेत. त्यांनी १२ एकर शेतीपैकी १० एकरमध्ये सोयाबीन पेरले होते. त्यातील ३५ क्विंटल सोयाबीन विकून त्यांना १ लाख २८ हजार ७०० रुपये रोख मिळाले होते. हे पैसे आणि अंदाजे १ लाख १४ हजार रुपये किमतीचा ४० ग्रॅम वजनाचा सोन्याचा चपलहार त्यांनी घरातील मागील खोलीत कॅटलीत सुरक्षित ठेवला होता.

मात्र २६ फेब्रुवारीच्या रात्री चोरट्यांनी घरातील जिन्यावरील पत्र्याच्या झाकणाची दोरी कापून घरात प्रवेश केला.अशोक धांडे हे शेतात झोपण्यासाठी गेले असताना घरात पत्नी, मुलगा आणि सून झोपलेले होते. सकाळी सहा वाजता पत्नी उठली असता कॅटली खाली पडलेली आणि उघडी दिसली. आत पाहताच रोख रक्कम आणि सोन्याचा हार गायब असल्याचे लक्षात आले. या प्रकरणी अशोक धांडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मेहकर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## शिव व्याख्याते नवनीत यशवंतराव यांचा शहा विद्यालयातर्फे सत्कार

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ वसंत पानसरे




**ठाणे :** शिवजयंती उत्सव आणि मराठी भाषा गौरव दिवसाच्या मुहूर्तावर, व्याख्याते प्रा. नवनीत यशवंतराव यांच्या ' शिवराय समजुन घेताना ' पुस्तकाचे प्रकाशन संपन्न!

ठाणे जिल्ह्यातील सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. नवनीत नंदकुमार यशवंतराव, गेली दहा वर्षापासून महाराष्ट्र, गुजरात, हरियाणा, कर्नाटक आदी राज्यांत व्याख्यान करत आहेत. या वर्षीच्या शिवजयंती उत्सव आणि मराठी भाषा गौरव दिवसाच्या निमित्ताने, कळवा येथील शिवजयंती कार्यक्रमात तसेच शहा चंदूलाल सरुपचंद विद्यालय किन्हवली येथे मराठी भाषा गौरव दिवसाच्या निमित्ताने मुख्याध्यापक गोपाळ वेखंडे सर, सावंत सर, खकाल सर तसेच ज्युनियर कॉलेजचे सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत ' शिवराय समजुन घेताना ' या पुस्तकाचे प्रकाशन पार पडले. भविष्यातील अत्यंत प्रसिद्धी पावणारे हे पुस्तक असेल असा आशावाद, सदर कार्यक्रम प्रसंगी उपस्थित असलेल्या सर्व शिक्षकांनी व्यक्त केला. यावेळी व्याख्याते प्रा. नवनीत नंदकुमार यशवंतराव, पुस्तका विषयी बोलताना म्हणाले, सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांना भाषणासाठी, ध्येय वेड्या युवकांना व्यवसायसाठी - स्वतंत्र अस्तित्वासाठी,पालकांना आदर्श संस्कार करण्यासाठी, अधिकाऱ्यांना सुप्रशासनासाठी उपयुक्त पुस्तक - ' शिवराय समजून घेताना ' . हे पुस्तक समाजातील सर्व घटकांनी जरूर वाचावे असे आवाहन त्यांनी व्यक्त केले.

## मृत्यूभोज टाळून समाजकार्यासाठी मदतीचा हात; अकोल्यातील मानकर कुटुंबियांचा आदर्श

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत






**अकोला :** आयुष्यभर ज्या विचारांचा प्रचार केला, तेच विचार शेवटच्या श्वासापर्यंत जपणाऱ्या अकोल्यातील ज्येष्ठ गायत्री प्रचारक श्रीमती पुष्पाताई देवलाल मानकर (८२) यांनी निधनानंतरही समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे. 'माझ्या निधनानंतर तेरवी किंवा मृत्यूभोज न घालता, तो खर्च लोकमंगल आणि परमार्थ कार्यासाठी खर्च करावा', ही त्यांची इच्छा त्यांच्या मुलांनी सार्थ ठरविली असून, विविध सामाजिक संस्थांना मोठी मदत सुपूर्द केली आहे.

श्रीमती मानकर यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पुत्र इंजिनीअर ॲड. किशोर मानकर, टाटा रिसर्चचे प्रो. डॉ. धनंजय मानकर आणि कन्या जिल्हा ग्राहक न्यायाधीश वैशाली मानकर-गावंडे यांनी आईच्या इच्छेनुसार परंपरेला फाटा देऊन सामाजिक बांधिलकी जोपासली. तेरवीच्या खर्चातून मानकर कुटुंबियांनी गायत्री तपोभूमी (मथुरा) निर्माण कार्य, गायत्री तीर्थ शांतिकुंज (हरिद्वार) येथील अन्नदान भंडारा यासह अकोल्यातील स्थानिक संस्थांना मदतीचा ओघ दिला. यात प्रामुख्याने: अकोला मेन हॉस्पिटल व जिल्हा स्त्री रुग्णालय (लेडी हार्डिंग्ज) मूकबधिर विद्यालय अनाथ आश्रम येथे अन्नदान करण्यात आले. तसेच स्मृती प्रित्यर्थ पाच 'देव वृक्षांचे' रोपण करून पर्यावरण रक्षणाचा संदेशही देण्यात आला. संघर्षमयी आणि समर्पित जीवन पुष्पाताई मानकर यांचे जीवन अत्यंत संघर्षमयी राहिले. मुले लहान असतानाच जोडीदाराचे छत्र हरपल्यानंतर त्यांनी आई आणि वडील अशा दोन्ही जबाबदाऱ्या समर्थपणे पेलल्या. गेल्या ४० वर्षांहून अधिक काळ त्यांनी अकोला जिल्ह्यात गायत्री परिवाराचे कार्य सांभाळले. अनेक अश्वमेध महायज्ञ आणि सेवाकार्यात त्यांनी 'समयदान' दिले. त्यांचे हेच सेवाव्रत आता त्यांची मुले पुढे चालवत आहेत. त्यांच्या निवासस्थानी गायत्री परिवारातर्फे सामूहिक श्रद्धांजली आणि प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गुरुदेवांनी रचलेल्या साहित्याचे वितरण करण्यात आले. जिल्ह्यातील असंख्य हितचिंतकांनी उपस्थित राहून पुष्पाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. शांतीपाठ आणि पुष्पांजलीने या सभेचा समारोप झाला. आईने आयुष्यभर गुरुदेवांचे विचार जगून दाखवले. त्यांनी जातानाही समाजाचे भले व्हावे हीच इच्छा व्यक्त केली होती, त्याचे पालन करणे हे आमचे कर्तव्य होते.. मानकर परिवार, कोला

प्रो.प्रा. ज़ाकीर खान
Mob- 9322174042
जबान मिठी हो तो बादशाह बना देती है
चाय मिलेंगी
बरकत केलाई दही लस्सी सेंटर
•मलाई लस्सी •दही लस्सी •मँगो लस्सी
• फालुदा लस्सी • रुहअफज़ा लस्सी •पायनॅपल
•निंबु शरबत •ऑरेंज शरबत • गुलाब शरबत
•मुंगो शरबत •रुह अफ़ज़ा शरबत •काला खट्टा •खश
पत्ता - चिखली, जिल्हा बुलढाणा